# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ९०–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. राजाराम शिवाजी जगताप ,<br>रा. कोत्येंन बोबलाद, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. श्री. राजाराम शिवाजी जगताप , रा. कोत्येंन बोबलाद,, ता. जत, जि. सांगली यांनी परिशिष्ट अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार प्रस्तुतची तक्रार मंचामध्ये दि. १४.१.२०१० रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार यांनी वितरण कंपनीकडे आपल्या शेतीपंपासाठी नवीन विद्युत पुरवठा मिळावा म्हणून दि. १४.१.२०१० रोजी अर्ज व फी रु. ५०/–पोष्टाने संख कार्यालयाकडे पाठविली. त्याचदिवशी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे क्ष फॉर्ममध्ये रितसर तक्रार दाखल केली. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार सर्व्हीस कनेक्शन असलेस २० दिवसांत व वितरण वाहिनीचा विस्तार असलेस ३० दिवसांत चलन मिळणे हे कृती मानकांनुसार आवश्यक आहे, परंतु असे चलन त्यांना आजतागायत मिळालेले नाही. अंतर्गत कक्षाने दि. १९.१.२०१० रोजी आदेश केले की, कृती मानके विनियमातील तरतुदी साध्य करण्यात अपयश आल्यास ग्राहकास द्यावयाच्या भरपाईबाबत निर्देश दिले आहेत. मंचाकडे तक्रारदाराने अर्ज दिलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष चलन मिळणे बाबत झालेल्या विलंबाबाबत कृती मानके विनियमानुसार भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे.

वि.प.ने आपल्या दि. १२.५.२०१० च्या लेखी अहवाल जो मंचामध्ये दि. १५.५.२०१० ला प्राप्त झाला त्यामध्ये तक्रारदाराने शेतीपंपासाठी अर्ज दि. १६.१.२०१० रोजी अर्ज केल्याचे व त्यांस दि. ७.५.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे. तक्रारदाराने चलन भरलेले नाही व चाचणी अहवाल दिलेला नाही. चलन भरलेनंतर व चाचणी अहवाल दिलेनंतर नियमाप्रमाणे कनेक्शन देण्यात येईल. तक्रारदाराचे ०.१८ कि.मी. लघुदाब वाहिनी काम करावे लागते असे म्हटले आहे.

सदरची तक्रार मंचासमोर दि. १८.५.२०१० रोजी सुनावणीस घेतली असता, तक्रारदार गैरहजर, प्रतिनिधी गैरहजर. वि.प.तर्फे श्री. दिवटे, सहाय्यक अभियंता, संख उप विभाग व श्री. अे.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी चलन दि. ७.५.२०१० ला दिल्याचे सांगितले. ०.१८ कि.मी. लघुदाब वाहिनी काम करावे लागते. तसेच चलन भरलेनंतर, चाचणी अहवाल दिलेनंतर व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर नियमाप्रमाणे कनेक्शन देण्यात येईल असे मंचासमोर सांगितले.

प्रस्तुत तक्रारीमध्ये तक्रारदार यांनी वि.प.कडून विलंबापोटी भरपाई मिळावी अशी प्रमुख मागणी केली आहे. वितरण कंपनी नियमाप्रमाणे वीज जोडणी देण्यास तयार आहे. तक्रारदाराने चलन भरावे, चाचणी अहवाल द्यावा व कागदपत्रांची पूर्तता करावी. परंतु जवळजवळ दि. १६.२.२०१० ते दि. ७.५.२०१० या ११ आठवड्यांच्या विलंबासाठी वि.प.ने कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही किंवा मा. विद्युत नियामक आयोगाकडून झालेल्या विलंबाच्या माफीसाठी नियम ११.२ खाली कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे नुकसान भरपाई मंजूर करु नये अशी केस नाही. उलट, चलन चलन देण्यास विलंब झाला आहे म्हणजेच कृती मानके विनियमातील तरतुदीची पूर्तता करण्यात वि.प. अपयश आले आहे, कृती मानकाचा भंग झाला आहे. त्यामुळे वितरण कंपनी भरपाई देणेस जबाबदार आहे व तक्रारदाराचा तो हक्क आहे. त्यामुळे ११ आठवड्यांच्या विलबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ११००/– इतकी भरपाई देणेचा आदेश करणे कायदेशीर व योग्य होईल. खालील प्रमाणे आदेश –

## <u>आदेश</u>

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.ने तक्रारदार यांस दि. १६.२.२०१० ते ७.५.२०१० या ११ आठवडे विलंबाच्या कालावधीसाठी प्रति आठवडा किंवा त्याच्या भागास रु. १००/– या प्रमाणे रु. ११००/– भरपाई द्यावी.

३) सदर रकमेचे दोन बिलींग सायकलमधून समायोजन करावे व उर्वरित रक्कम तक्रारदारास रोखीने द्यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :